५१६

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन - कृषी विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३०, अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/२ ई-मेल :mahapocra@gmail.com

---

जा क्र.-नादेकृसंप्र- / प्र.क्र.४५/समाजशास्त्र/२०२१/१६८ दि.२४.०२.२०२१

प्रति,
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**(प्रकल्पातील सर्व जिल्हे)**

**विषय- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत स्थापित ग्राम कृषि संजीवनी समितीचे कामकाज व लाभार्थी निवड कार्यपद्दतीबाबत मार्गदर्शक सुचना**

संदर्भ- १) कृषि विभागाकडील शा.नि. क्र. हअप्र/०७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष दि.१०.८.२०१६
२) कृषि विभागाकडील शा.नि. क्र. नादेप्र/१०१७/प्र.क्र.११५/राकृवियो कक्ष दि.०७.११.२०१७
३) कृषि विभागाकडील शा.नि. क्र. हअप्र/०७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष दि.१७.०१.२०१८
४) ना.दे.कृ.स.प्र.-०६१८/ प्र.क्र.७६ /८६३/ २०१८-१९ दिनांक १९/२०.११.२०१९

संदर्भिय शासन निर्णय १ अन्वये राज्यातील १५ जिल्ह्यामध्ये हवामान अनुकूल कृषि प्रकल्प राबविणेस मान्यता दिलेली आहे. दिनांक-१७/१/२०१७चे शासन निर्णयान्वये सदर प्रकल्पाचे नाव नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प असे करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प कृषि विभागामार्फत राबविणेत येतआहे

सदर प्रकल्पांतर्गत विविध स्तरावरील कामकाज करणेसाठी विविध समित्यांची रचना करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचे नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी गावातील लोकांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे त्या करिता प्रकल्पाचे गावपातळीवर नियोजन व प्रभावी अमंलबजावणी करण्याच्या उद्देशाने वरील संदर्भिय शासन निर्णय क्र.२ नुसार ग्रामपंचायतस्तरावर सरपंचांचे अध्यक्षतेखाली ग्राम कृषि संजीवनी समितीचे गठन करण्यात आले आहे.

ग्राम कृषि संजीवनी समितीने करावयाचे कामकाज, त्या समितीस असलेले अधिकार, समितीव्दारा लाभार्थी निवड करावयाची कार्यपध्दती या बाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**समितीचे गठन व रचना-**

प्रकल्पांतर्गत निवडलेल्या प्रत्येक गावांमध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ (४९) अन्वये ग्राम कृषि संजीवनी समिती स्थापन करणेचा निर्णय घेणेत आलेला आहे. सदर समिती ग्रामपंचायतीची विकास/ प्रकल्प समिती म्हणून कार्यरत असेल. समितीमधील सदस्यांची संख्या १३ असेल. समितीमधील एकूण सदस्यांपैकी किमान दोनतृतीयांश सदस्य अत्यल्पभूधारक (जमीनधारणा १ हे. पर्यंत) किंवा अल्पभूधारक (जमीनधारणा १ ते २ हे.) असतील तसेच एक तृतीयांश सदस्य हे ग्रामपंचायत सदस्यांपैकी असतील. त्याचप्रमाणे समितीमध्ये महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व किमान ५०% असणे बंधनकारक राहील. सदर समितीमध्ये ग्रामपंचायतीच्या ज्या गावांमध्ये प्रकल्प राबवायचा आहे त्याच गावातील सदस्यांचा समावेश राहील. (मात्र सरपंच व उपसरपंच यासाठी अपवाद असतील.) समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | समिती सदस्य व त्यांचा प्रवर्ग/ कार्यक्षेत्र | सदस्य संख्या | पदनाम |
|---|---|---|---|
| **१.** | **कार्यकारी सदस्य** | | |
| १ | सरपंच | १ | पदसिद्ध अध्यक्ष |
| २ | उप सरपंच | १ | पदसिद्ध सदस्य |
| ३ | ग्रामपंचायत सदस्य- (पुरुष १ व महिला १) | २ | सदस्य |

| अ.क्र | समिती सदस्य व त्यांचा प्रवर्ग/ कार्यक्षेत्र | सदस्य संख्या | पदनाम |
|---|---|---|---|
| ४ | प्रगतशील शेतकरी (सर्वसाधारण- १, अ. जाती/अ. जमाती/ विमुक्त जाती/भटक्या जमाती -१) | २ | सदस्य |
| ५ | महिला शेतकरी (सर्वसाधारण- १, अनुसूचित जाती/अ. जमाती -१, विमुक्त जाती/भटक्या जमाती -१) | ३ | सदस्य |
| ६ | शेतकरी उत्पादक गट/कंपनी प्रतिनिधी | १ | सदस्य |
| ७ | महिला बचत गट प्रतिनिधी | १ | सदस्य |
| ८ | कृषि पूरक व्यावसायिक शेतकरी | २ | सदस्य |
| **अ.** | **एकूण कार्यकारी सदस्य** | **१३** | |
| **२.** | **अकार्यकारी सदस्य** | | |
| १ | कृषि सहाय्यक | १ | पदसिद्ध तांत्रिक सदस्य |
| २ | ग्राम सेवक / ग्राम विकास अधिकारी | १ | सदस्य सचिव |
| ३ | समूह सहाय्यक | १ | सह सचिव |
| ४ | कृषि ताई/ कृषि मित्र | १ | विस्तार कार्य प्रेरक |
| **ब.** | **एकूण अकार्यकारी सदस्य** | **४** | |

**ग्राम कृषि संजीवनी समिती अध्यक्षाचा व सदस्यांचा कालावधी-**

१. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या अध्यक्षांचा कालावधी हा त्या सरपंच पदाच्या कालावधी एवढाच राहील.

२. ग्राम कृषि संजीवनी समितीमधील उपसरपंच व ग्रामपंचायतीच्या सदस्यांचा कालावधीही त्यांच्या सदस्यपदाच्या कालावधी एवढाच राहील.

३. प्रत्येक ग्रामपंचायती करिता स्वतंत्र ग्राम कृषि संजीवनी समिती स्थापन करण्यात यावी.

४. नवीन ग्रामपंचायत गठीत झाल्यावर आधीच्या समितीचे सदस्य म्हणून कार्य केलेल्या व्यक्ती समितीच्या सदस्यपदी निवडण्यास पात्र ठरत असतील तर त्यांची पुर्ननियुक्ती करता येईल.

**ग्राम कृषि संजीवनी समितीच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या-**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांचे सविस्तर प्रकल्प नियोजन करुन प्रकल्प आराखडे तयार करण्यास प्रकल्प यंत्रणा व कृषि विभागास सहाय्य करणे.

२. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या सभा आवश्यकतेनुसार नियमितपणे आयोजित करुन सभेतील निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाहीचा पाठपूरावा व समन्वय करणे.

३. गावनिहाय सहभागीय सुक्ष्मनियोजन आराखडयास तसेच सविस्तर प्रकल्प आराखडयास ग्रामसभेची मान्यता घेणे.

४. मंजूर वार्षिक कृती आराखडयानुसार घटकांची व कामांची अमंलबजावणी करणे.

५. प्रकल्पाचा लाभ लहान सिमान्तिक शेतकरी, अनुसुचित जाती/ अनुसुचित जमातीतील शेतकरी व महिला शेतकऱ्यांना मिळण्याच्या उद्देशानेप्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनानूसार पात्र शेतकऱ्यांची संबंधित घटकाच्या लाभासाठी निवड करणे.

६. निवडलेल्या शेतकऱ्यांना संबंधित घटकांचे निकष समजावून काम पूर्ण करण्यास प्रवृत्त करणे व या प्रयोजनार्थ गरजेनुसार पात्र शेतकऱ्यांना स्थानिक बँकेकडून अर्थसहाय्य् मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे आणि घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करण्यास लाभार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

७. समायिक जमिनीवर मृदसंधारण, जलसंधारण, वृक्षलागवड इ. कामे तांत्रिकदृष्टया परिपूर्णपणे करुन घेणे व झालेल्या कामांची देखभाल- दुरुस्ती करणे.

८. हवामानातील आकस्मिक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या विपरीत / आपत्कालीन पीक आराखडा तयार करणे व अशी परिस्थिती उद्धवल्यास आराखडयाची अमंलबजावणी करणे.

९. समितीस वितरीत निधीतून वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्रकल्पाची कामे करणे.
१०. प्रकल्पांतर्गत केल्या जाणाऱ्या सर्व कामांच्या नोंदी करणे व संपूर्ण अभिलेख ग्रामपंचायत कार्यालयात जतन करणे.
११. समायिक कामे पूर्ण झाल्यानंतर गरजेनुसार वरिष्ठ कार्यालयाकडे निधीची मागणी करणे.
१२. प्रकल्पांतर्गत चालू असलेल्या व पूर्ण करण्यात आलेल्या सर्व बाबींचे सामाजिक लेखा परिक्षण करणे.
१३. प्रकल्पांतर्गत झालेल्या कामांचा तपशील व खर्च ग्रामसभेसमोर सादर करणे.
१४. समितीच्या कामकाजाचे वार्षिक विवरण स्वतंत्रपणे ठेवणे.
१५. प्रकल्प क्षेत्रामध्ये प्रकल्पातील घटकांच्या अमंलबजावणीमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना उपभोक्ता गट निर्माण करुन त्यांना प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सर्वमत्तांच्या जबाबदारीने वापरासाठी व देखभालीसाठी प्रवृत्त करणे.
१६. गावातील शेती विषयक गरजा भागविण्यासाठी सदर प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीबरोबरच कृषि व संलग्न विभागाच्या वेगवेगळया योजनांशी सांगड घालण्यासाठी समन्वय साधणे.
१७. ग्राम कृषि संजीवनी समितीचे आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी समितीचे अध्यक्ष व संबंधित गावातील कृषि सहाय्यक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यात येऊन सर्व रक्कमांची प्रदाने समितीने घेतलेल्या ठरावानुसार व शासनाने वेळोवेळी दिलेल्या अरदेशानुसार करणे.
१८. दैनंदिन रोख पुस्तिका ठेवणे व दर महिन्याला त्याचा ताळमेळ घेण्याची जबाबदारी कृषि सहाय्यकावर राहील. लेखा परिक्षणाचे वेळी अभिलेख दाखविण्याची जबाबदारी कृषि सहाय्यक व समूह सहाय्यक यांचेवर संयुक्तपणे राहील.
१९. मासिक प्रगती अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणेची जबाबदारी समूह सहाय्यक यांचेवर राहील.
२०. ग्राम कृषि संजीवनी समितीचे सहसचिव यांनी गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे दिसून आल्यास किंवा प्रकल्पाच्या नेमून दिलेल्या कामात कुचराई केल्यास ग्राम कृषि संजीवनी समिती कारणासह ठराव घेऊन त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करु शकेल व अशाप्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.
२१. अनुसुचित क्षेत्रामध्ये समितीचे कार्यान्वयन पेसा कायद्यातील तरतुदीनुसार होईल.
२२. समितीच्याअध्यक्षांनी गैरवर्तन/ गैर व्यवहार केल्याचे दिसून आल्यास ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनानुसार कारवाई करण्यात येईल.
२३. ग्राम कृषि संजीवनी समितीने प्रकल्पाच्या प्रत्येक गावासाठी एक कृषिताईचे नाम निर्देशन करावे.

**प्रकल्पातील मंजूर घटक-**

सदर प्रकल्पांतर्गत मंजूर घटकांचा आणि बाबींचा तपशील प्रपत्र 'अ' मध्ये दिलेला आहे. कृषि विभागाच्या प्रचलित योजनांमधील मंजूर घटकांसाठीचे कमालअनुदान दर या प्रकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेल्या घटकांसाठी देखील लागू राहतील. सोबत प्रपत्र 'अ' मध्ये नमूद केलेले अनुदान दर संबधित योजनेमध्ये बदलल्यास त्याप्रमाणे प्रकल्पासाठीही सदर बदल लागू राहतील.

**ग्राम कृषि संजीवनी समितीव्दारा लाभार्थी निवड -**

कृषि विभागाकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांमध्ये असणा-या प्रचलित निकषांनुसार प्रस्तुत प्रकल्पासाठी ग्राम कृषि संजीवनी समितीव्दारा लाभार्थी निवड करण्यात यावी. प्रकल्पांतर्गत लाभासाठी प्रकल्पाचे डी.बी.टी. पोर्टलवर अर्ज करण्यात यावा. सदर लाभार्थी निवड करतांना अत्यल्प भूधारक (अजा/अज/महिला/दिव्यांग/इतर), अल्प भूधारक (अजा/अज/महिला/दिव्यांग/इतर) अशा पद्धतीने निवड करण्यात यावी.

**लाभार्थी निवड व कामाची अंमलबजावणी कार्यपध्दती-**

१. प्रकल्पांतर्गत मंजूर घटकांचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांकडून ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ग्राम कृषि संजीवनी समितीने व्यापक प्रसिद्धी द्यावी व लाभार्थी निवडीबाबत आयोजित करण्यात येणा-या ग्राम कृषि संजीवनी समितीच्या बैठकीची तारीख ही किमान ७ दिवस अगोदर जाहीर करुन त्यास पुरेशी प्रसिध्दी द्यावी.
२. कागदपत्रांची तपासणी करुन पात्रता निकष पुर्ण करणा-या शेतकऱ्यांची यादी समूह सहाय्यक यांनी ग्राम कृषि संजीवनी समितीकडे सादर करावी. तसेच समूह सहाय्यक यांनी पात्रता निकष पूर्ण न करणा-या अर्जदार शेतक-यांची कारणांसह यादी देखील समितीकडे माहितीस्तव सादर करावी.

३. ग्राम कृषि संजीवनी समितीने सदर यादीतील अर्जदारांची पात्रता विचारात घेऊन लाभासाठी प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार निवड यादी तयार करावी, व त्यास मान्यता द्यावी. या साठी प्रथम अत्यल्पभूधारक अर्जदारांपैकी अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकरी नंतर अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी नंतर दिव्यांग शेतकरी नंतर महिला शेतकरी व तदन्तर इतर शेतकरी हा प्राधान्यक्रम विचारात घेऊन लाभार्थी निवड यादी तयार करावी. अत्यल्पभूधारक अर्जदारांपैकी पात्र शेतक-यांची निवड केले नंतर याच प्राधान्यक्रमानुसार अल्पभूधारक तसेच 2 ते 5 हे. मर्यादेत जमीनधारक अर्जदार शेतक-यांमधून देखील निवड करावी.

४. समूह सहाय्यक/कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी यांनी अर्जदार शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रास भेट देऊन क्षेत्रिय पहाणी करुन मागणी केलेली बाब तांत्रिकदृष्टया योग्य असल्याची खात्री करावी. एकूण कामकाजाचा भार विचारात घेऊन उपविभागीय कृषि अधिकारी यांनी वरील कर्मचारी / अधिकारी यांचेमध्ये कामाची विभागणी करावी.

५. सदरची यादी गावाचे नोटीस बोर्डवर त्याच वेळी प्रसिध्द करावी.

६. पूर्व संमतीपत्र दिलेल्या लाभार्थीने मंजूर घटकाची उभारणी मार्गदर्शक सुचनेमध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. अन्यथा सदरचे पूर्व संमतीपत्र आपोआप रद्दबातल होत असल्याबाबत ग्राम कृषि संजीवनी समितीने लाभार्थ्यास स्पष्ट जाणीव करून द्यावी.

७. लाभार्थीने मंजूर घटकाची/ घटकांची उभारणी पूर्ण करुन संबधित कृषि सहाय्यक/ समूह सहाय्यक यांना कळवावे. तदनंतर तातडीने / शक्य तेवढ्या लवकर सदर घटकांची क्षेत्रीय तपासणी समूह सहाय्यक/कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी यांनी सदर घटकासाठी विहित केलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे करावी.

८. वैयक्तीक लाभापोटीचे देय अनुदान थेट डीबीटी व्दारे लाभार्थीचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. तरी त्यासाठ अर्जदार शेतकऱ्यांचे बँक खाते आधाराशी संलग्न असणे आवश्यक आहे याबाबत संबंधिताना जाणीव करून द्यावी.

९. ग्राम सभेने मंजूरी दिलेल्या वार्षिक आराखड्यामधील सामाईक क्षेत्रावरील कामे / उपचारांची अंमलबजावणी करणेची कार्यवाही ग्राम कृषि संजीवनी समितीने करावयाची आहे. त्या त्या आर्थिक वर्षामध्ये हाती घ्यावयाची कामे / उपचारांचे सविस्तर प्रस्ताव कृषि सहाय्यक व समूह सहाय्यक यांनी समितीचे मान्यतेने तयार करावेत. सदरचे प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत. प्राप्त प्रस्तावांची उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयाने प्रचलित निकष व पध्दतीस अनुसरुन तांत्रिक पडताळणी / छाननी (जागा योग्यतेसह) करुन तांत्रिक मान्यतेचे आदेश निर्गमित करावेत. सदर आदेशाची प्रत ग्राम कृषि संजीवनी समितीस द्यावी.

१०. उपविभागीय कृषि अधिकारी यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झालेनंतर प्रस्तावात नमूद केलेल्या कामाची अमंलबजावणी करणेसाठी समितीने संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्रठेकेदाराची निवड करावी.पात्र निविदा धारकास समितीने अध्यक्ष व कृषि सहायय्क यांचे संयुक्त स्वाक्षरीने कार्यारंभ आदेश द्यावेत. दरपत्रके मागविणेसाठी सोबत नमुना सहपत्रित करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. जर समितीस आवश्यक वाटले तर उ.वि.कृ.अ. यांना सदर प्रक्रिया पूर्ण करणे बाबत विनंती करावी.

११. काम पुर्ण झालेनंतर कृषि सहाय्यक यांनी सदर कामाची मोजमापे विहित मापन पुस्तीकेत नोंदवावीत. कृषि पर्यवेक्षक / मंडळ कृषि अधिकारी / उपविभागीय कृषि अधिकारी यांनी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांनी निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार वमापदंडानुसारमापन पुस्तीकेतील नोंदीची तपासणी करुन प्रमाणित करावे.

१२. सामूहीक क्षेत्रावरील कामाची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

१३. सामूहीक क्षेत्रावरील कामाची नोंद ग्रामपंचायत स्तरावरील समुचित संसाधन नोंदवहीमध्ये करावी. सदरची नोंदवही पर्यवेक्षीय अधिका-यांना तपासणी साठी उपलब्ध करुन द्यावी.

**तक्रार निवारण व्यवस्था-**

प्रकल्पाची अंमलबजावणी करताना काही तक्रारी उद्भवल्यासत्याचे कालबद्ध निराकरण होणे आवश्यक आहे. यासाठी तक्रारींचे निवारण करणारी व्यवस्था प्रकल्पात अंतर्भूत आहे. सदर व्यवस्थाही ग्राम पंचायत, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि प्रकल्प व्यवस्थापन कक्ष कार्यालयात कार्यरत असेल.

ग्राम कृषि संजीवनी समिती गाव पातळीवरील सर्व तक्रारींचे निराकरण करण्याचा सर्वतोपरीने प्रयत्न करेल. मात्र ग्राम कृषि संजीवनी समिती काही तक्रारींचे निराकरण करु न शकल्यासते ग्रामसभेमध्ये करण्यात यावे. यासाठी गावक-यांना सामाजिक प्रवर्तक, कृषिमित्र व समूह सहाय्यक मदतकरतील.

ग्रामपंचायतींमधील तसेच ग्रामपंचायत व सेवा पुरवठादार यांचेमधील तक्रारींचे निवारण संबधित उपविभागीय कृषि अधिकारी करतील. ग्रामसभेस आवश्यकवाटले तर तक्रार निवारणाकरीता ५ सदस्यीय समिती स्थापित करावी. यामध्ये संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी , एक संबंधित तांत्रिक सदस्य (शक्यतो स्थान आणि विवादाशी परिचित) तसेच ग्रामसभा नामनिर्देशित संबंधित प्रत्येकी एक व्यक्ती यांचा समावेश असेल. दोन्हींपैकी एक अथवा दोन्ही पक्ष उपविभागीय कृषि अधिका-याच्या निर्णयास समाधानी नसल्यास ते संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-याकडे अपिल करु शकतात. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांचानिर्णय अंतिम आणि सर्व पक्षांवर बंधनकारक असेल. ग्राम कृषि संजीवनी समितीकडे प्राप्त होणा-या तक्रारीची तक्रार निवारण नोंदवही मध्ये नोंद करण्याची जबाबदारी समितीचेसहसचिवयांची राहील. प्रत्येक ग्राम कृषि संजीवनी समिती सभेमध्ये प्राप्त तक्रारींचाव त्यावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा नियमितपणे घेण्यात यावा. जिल्हास्तरीय समन्वय समितीमध्येही प्राप्त तक्रारींचाव त्यावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा नियमितपणे घेण्यात यावा.

ग्राम कृषि संजीवनी समिती/ ग्रामपंचायत स्तरावर लेखी तक्रारी, संबंधित ग्रामपंचायतीत सार्वजनिक ठिकाणी ठेवलेल्या सीलबंद पेटीमध्ये टाकला येईल. ग्राम कृषि संजीवनी समिती व समूह सहायक यांच्या उपस्थितीत ठराविक तारखेला ही तक्रार पेटी उघडण्यात येईल व प्राप्त तक्रारींवर चर्चा केली जाईल आणि त्यांचे निराकरण 15 दिवसाच्या कालावधीमध्ये करण्यात येईल.

ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर तक्रार नोंदणीसाठी पोस्टाद्वारे/ई मेल द्वारे सुद्धा संपर्क साधता येईल.

**इतर सर्वसाधारण सुचना-**

१. ग्राम कृषि संजीवनी समितीने केलेल्या कामकाजाचा अहवाल पुढील ग्रामसभेसमोर सादर करणे अनिवार्य आहे.

३. ग्राम कृषि संजीवनी समितीचे खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात यावे. यासाठी स्वतंत्र सुचना निर्गमित केलेला आहे.

४. सुक्ष्म नियोजन आराखड्याच्याआधारे तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प आराखड्यामध्ये नमूद असलेली कामेच ग्राम कृषि संजीवनी समितीस घेता येतील. सदर सविस्तर प्रकल्प आराखड्यास ग्रामसभेची मान्यता आवश्यक आहे. विशेषतः मृद व जलसंधारण उपचाराची कामे पाण्याच्या अंदाजपत्रकानुसारच उपलब्ध होणा-या पाणी साठ्यास व अपधावाच्या (runoff) अधिन राहून घेणे बंधनकारक आहे.

सदर मार्गदर्शक सूचनांचा अवलंबकरून प्रस्तुत प्रकल्पातील घटक व बाबींची अंमलबजावणी करण्यात यावी.

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत - माहितीस्तव सादर-**

सचिव(कृषि), मंत्रालय, मुंबई

**प्रत - माहिती तथा पूढील कार्यवाहीस्तव....**

१. आयुक्त,कृषि , महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. जिल्हाधिकारी, (प्रकल्प क्षेत्रातील सर्व जिल्हे)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (प्रकल्प क्षेत्रातील सर्व जिल्हे)
४. विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद,लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक
५. प्रकल्प संचालक आत्मा (प्रकल्पातील सर्व जिल्हे)
६. उपविभागीय कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व जिल्हे)
७. अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

## प्रपत्र-"अ"- प्रकल्पांतर्गत मंजूर घटकांचा आणि बाबींचा तपशील

| अ. क्र | घटक, उपघटक व बाबी | परिमाण | प्रकल्प अर्थसहाय्य (2 हे.पर्यंत) | प्रकल्प अर्थसहाय्य (2 हे. पेक्षा जास्त ते जास्त 5 हे. पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| I | **हवामान अनुकूल कृषि पद्धतीस प्रोत्साहन** | | | |
| 1 | **जमिनीमध्ये कर्ब ग्रहणाचे प्रमाण वाढविणे** | | | |
| | 1. वानिकी आधारीत शेती पद्धती | क्षेत्र | ७५% | ६५% |
| | १.१ बांबू लागवड | क्षेत्र | ७५% | ६५% |
| | 2. फ़ळबाग लागवड | | | |
| | आंबा (5 x 5) - प्रथम वर्ष | क्षेत्र | ५०% | ५०% |
| | आंबा (5 x 5) - द्वितीय वर्ष | क्षेत्र | ३०% | ३०% |
| | आंबा (5 x 5) - त्रितीय वर्ष | क्षेत्र | २०% | २०% |
| | लिंबू वर्गीय- प्रथम वर्ष | क्षेत्र | ५०% | ५०% |
| | लिंबू वर्गीय - द्वितीय वर्ष | क्षेत्र | ३०% | ३०% |
| | लिंबू वर्गीय - त्रितीय वर्ष | क्षेत्र | २०% | २०% |
| | सिताफळ/ पेरू/ आवळा -प्रथम वर्ष | क्षेत्र | ५०% | ५०% |
| | सिताफळ/ पेरू/ आवळा - द्वितीय वर्ष | क्षेत्र | ३०% | ३०% |
| | सिताफळ/ पेरू/ आवळा - त्रितीय वर्ष | क्षेत्र | २०% | २०% |
| | डाळिंब -प्रथम वर्ष | क्षेत्र | ५०% | ५०% |
| | डाळिंब - द्वितीय वर्ष | क्षेत्र | ३०% | ३०% |
| | डाळिंब - त्रितीय वर्ष | क्षेत्र | २०% | २०% |
| 2 | **क्षारपड व चोपण जमिनीचे व्यवस्थापन** | | | |
| | इनलेट व आउटलेट्सह शेततळे आणि आउटलेटमध्ये गवताची लागवड/ गावाती बांध (15 X15X 3 मी )ते (30X30 X3 मी ) | संख्या | ५०% | ५०% |
| | तुषार सिंचन | संख्या | ८०% | ७५% |
| ३ | **संरक्षित शेती** | | | |
| | शेडनेट हाऊस (GI/MS पाईप)(१००० चौ .मी. ते 4000चौ.मी.) | क्षेत्र | ७५% | ६५% |
| | पॉलीहाऊस (नैसर्गिक वायुविजन)(१००० चौ मी ते 4000 चौ.मी) | क्षेत्र | ७५% | ६५% |
| | पॉली, टनेल (१००० चौ मी ते 4000 चौ. मी) | क्षेत्र | ७५% | ६५% |
| | पॉलीहाउस/ शेडनेट हाऊसमध्ये भाजीपाला उच्च मुल्यांकित लागवड साहित्य | क्षेत्र | ७५% | ६५% |
| | पॉली टनेलमध्ये भाजीपाला उच्च मुल्यांकित लागवड साहित्य | क्षेत्र | ७५% | ६५% |
| 5 | **एकात्मिक शेती पद्धती** | | | |
| | कुक्कुट पालन | संख्या | ७५% | ६५% |
| | **रेशीम उद्योग**<br>नर्सरी<br>तुती लागवड<br>कोष निर्मिती<br>शेड बांधणी | संख्या | **अनुसूचित जाती/ जमाती**<br>९०%<br>**सर्व साधारण**<br>७५% | ६५% |
| | मधुमक्षिका पालन | संख्या | ७५% | ६५% |
| | गोड्या पाण्यातील मत्स्यपालन | संख्या | ७५% | ६५% |
| 6 | **जमीन आरोग्य सुधारणे** | | | |

| अ. क्र | घटक, उपघटक व बाबी | परिमाण | प्रकल्प अर्थसहाय्य (2 हे.पर्यंत) | प्रकल्प अर्थसहाय्य (2 हे. पेक्षा जास्त ते जास्त 5 हे. पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| अ | गांडूळ खत आणि नाडेप पद्धतीने सेंद्रिय निविष्ठ उत्पादन | संख्या | ७५% | ६५% |
| | सेंद्रिय खत निर्मिती युनिट | संख्या | ७५% | ६५% |
| ३ | **पाणी साठवण संरचनांची निर्मिती** | | | |
| | शेततळे-अस्तरीकरणासह (15 X15X3 मी) ते (30X30X3मी) | संख्या | ५०% | ५०% |
| | शेततळे अस्तरीकरणाशिवाय (15X15X 3 मी) ते (30X30X3) | संख्या | ५०% | ५०% |
| | शेततळे इनलेट व आउटलेट शिवाय (अस्तरीकरणासह) (२०x १५x ३ ते ३०x ३०x ३) | संख्या | ७५% | ६५% |
| | शेततळ्यांचे बळकटीकरण (अस्तरीकरण) (15 X15X3 मी) ते (30 X30X3मी ) | संख्या | ७५% | ६५% |
| ५ | **भूजल पुनर्भरण** | | | |
| | विहिरींचे पुनर्भरण करणे | संख्या | १००% | १००% |
| ७ | **सुक्ष्म सिंचन** | | | |
| | ठिबक सिंचन | क्षेत्र | ८०% | ७५% |
| | तुषार सिंचन | क्षेत्र | ८०% | ७५% |
| ८ | **संरक्षित सिंचनाकरिता पाण्याची उपलब्धता** | | | |
| 3 | हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाणे तयार करणे | क्षेत्र | १००% | १००% |
| | रुंद वाफा व सारी तंत्र ज्ञान अवलम्बंयास प्रोत्साहन | क्षेत्र | १००% | १००% |
| II | **पाण्याचा कार्यक्षम व शाश्वत पद्धतीने वापर** | | | |
| 1 | क्षेत्र उपचार | | | |
| | सलग समतल चर मॉडेल ५ ते ८ (0.30 मीटर) | क्षेत्र | १००% | १००% |
| | सलग समतल चर मॉडेल ५ ते ८ (0.४५ मीटर) | क्षेत्र | १००% | १००% |
| | खोल सलग समपातळी चर | क्षेत्र | १००% | १००% |
| 2 | **ओघळीवरचे उपचार** | | | |
| | अनगड दगडाचे बांध | संख्या | १००% | १००% |
| | गॅबियन बंधारा | संख्या | १००% | १००% |
| | माती नाला बांध | संख्या | १००% | १००% |
| | सिमेंट नाला बांध | संख्या | १००% | १००% |
| ४ | **जुन्या जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन (गाळ काढणे/खोलीकरण/ दुरुस्ती)** | संख्या | १००% | १००% |
| ६ | **मुलस्थानी जलसंधारण** | | | |
| | (शेत बांध बंदिस्ती/ढाळीचे बांधबंदिस्ती) | क्षेत्र | १००% | १००% |
| | वैयक्तिक शेततळे ब्रिजेस | क्षेत्र | १००% | १००% |
| | पुर्नभरण शाफ्ट | क्षेत्र | १००% | १००% |
| | पुर्नभरण चरासह पुर्नभरण शाफ्ट | क्षेत्र | १००% | १००% |
| | सार्वजनिक क्षेत्रावर इनलेट ॲंड आउटलेट सह शेततळे | क्षेत्र | १००% | १००% |
| | गुरे प्रतिबंधक चर | क्षेत्र | १००% | १००% |
| III | **काढणी पश्चात व्यवस्थापन व हवामान अनुकूल मुल्य साखळीचे बळकटीकरण** | | | |
| 1 | **पायाभूत सुविधा निर्माण करणे** | | | |
| | प्रतवारी व संकलन केंद्र | संख्या | ६०% | ६०% |

| अ. क्र | घटक, उपघटक व बाबी | परिमाण | प्रकल्प अर्थसहाय्य (2 हे.पर्यंत) | प्रकल्प अर्थसहाय्य (2 हे. पेक्षा जास्त ते जास्त 5 हे. पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| | गोदाम | संख्या | ६०% | ६०% |
| | प्राथमिक प्रक्रिया केंद्र | संख्या | ६०% | ६०% |
| | पूर्व शीतकरण गृह | संख्या | ६०% | ६०% |
| | शीतगृह | संख्या | ६०% | ६०% |
| | रायपनिंग चेंबर | संख्या | ६०% | ६०% |
| | स्थायी /फिरते विक्री केंद्र | संख्या | ६०% | ६०% |
| | शेतमाल वाहतुकीकरिता वाहन/ शीतवाहन | संख्या | ६०% | ६०% |
| | मूर घास/ पशु खाद्य निर्मिती | संख्या | ६०% | ६०% |
| | निंबोडी अर्क निर्मिती | संख्या | ६०% | ६०% |
| 2 | भाडे तत्वावर कृषि अवजारे केंद्र -सुविधा निर्मिती | संख्या | ६०% | ६०% |
| 4 | **बियाणे हबसाठीपायाभूत सुविधांचाविकास करणे** | | | |
| | बियाणे प्रक्रिया उपकरणे 1000 मे.टन क्षमतेसाठी | संख्या | ६०% | ६०% |
| | बियाणे सुकवणी यार्ड 1000 मे.टन क्षमतेसाठी | संख्या | ६०% | ६०% |
| | बियाण्याची साठवण / गोदाम 700 चौ.मी. (क्षमता 1000 मे.टन) | संख्या | ६०% | ६०% |